## प्रतिबंधात्मक लसीकरण प्रभावी

गोवरची लस ही रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी अतिशय प्रभावी आहे, लसीकरणाने गोवरमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये जगभरात 80% घट झाली आहे. या लसीचे दोन डोस दिले जातात. जन्मानंतर 9 व्या ते 12 व्या महिन्याच्या दरम्यान पहिला डोस आणि 15 महिने ते 18 महिने या दरम्यान दुसरा डोस दिला जातो. लसीकरणाच्या पहिल्या डोसनंतर प्रतिकारशक्ती पूर्णपणे विकसित होत नाही. दुसऱ्या डोसनंतर जवळजवळ 95 ते 97% मुलांमध्ये गोवरच्या विरुद्ध प्रतिकारशक्ती विकसित होते. लसीचा प्रभाव बरीच वर्षे टिकतो. दीर्घकालीन प्रभावामुळे गोवरची लस अत्यंत गुणकारी आणि सुरक्षित अशी सिध्द झाली आहे. गोवरची लस दोन प्रकारात मिळते. एक म्हणजे प्रत्यक्ष गोवरची लस (Anti-measles Vaccine) आणि दुसरा प्रकार म्हणजे संयोगित लस. यात एम एम आर लस (MMR) (गोवर, रुबेला लस आणि गालगुंड लस यांची एकत्रित लस) किंवा एम आर लस (MR) (गोवर आणि रुबेला यांची एकत्रित लस) अशा संयोगामध्ये मिळते. यातील कुठलीही गोवरची लस ही गोवर प्रतिबंधित करण्यासाठी सारखीच प्रभावी आहे.



सध्या काही भागांत गोवरची साथ मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, लसीकरण नसलेल्या रुग्णांमध्ये आजार जास्त प्रमाणात बळावत असल्याचे सिद्ध होत आहे. गोवरच्या आजारावर लसीकरण हे अत्यंत प्रभावी सिद्ध होत आहे. सर्वांनी आपल्या मुलांचे संरक्षण ही लस देऊन करणे आवश्यक आहे. सरकारी मार्गदर्शक तत्त्वानुसार सर्वांनी गोवरची लस घ्यावी आणि इतर मुलांना देखील लसीकरणाबाबत प्रोत्साहित करावे. आपले आणि आपल्या मुलांचे आरोग्य आपल्याच हाती आहे.

**सौजन्य-डॉ. मंगेश पाटे**


सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC


सार्वजनिक आरोग्य विभाग

महाराष्ट्र शासन

# गोवरला हरवूयात लसीकरण करूयात!



# गोवर

गोवर हा विषाणूमुळे होणारा एक अत्यंत संसर्गजन्य रोग आहे. गोवर हा संसर्ग झालेल्या पेशंट्स खोकल्यामुळे आणि शिंकण्यामुळे सहज पसरतो. हा आजार तोंड किंवा नाकातील स्राव यांच्या थेट संपर्काद्वारे देखील पसरु शकतो. संपर्कात आलेल्यांपैकी 90% लोकांना हा आजार होऊ शकतो इतका हा संसर्गजन्य रोग आहे. गोवर हा व्हायरसमुळे होणारा आजार असल्याने या आजारावर ठोस असे औषध नाही. यात फक्त लक्षणांसाठी आवश्यक अशी औषधं लागतात. हा आजार शक्यतो आपल्या शारीरिक प्रतिकारशक्तीमुळे आपोआप बरा होतो. क्वचित काही रुग्णांमध्ये काही गुंतागुंत (complications) या निर्माण होऊ शकतात.



साधारणतः ज्या रुग्णांमध्ये कुपोषण, मुडदूस या पोषणाशी निगडित समस्या असतात, किंवा ज्यांच्यात 'अ' जीवनसत्वाची कमतरता असते अशा रुग्णांमध्ये गोवरचा आजार गुंतागुंत किंवा complications निर्माण करु शकतो. गरोदर स्त्रियांमध्ये देखील complications ची शक्यता असते. ज्यांच्यामध्ये मुळतः प्रतिकारशक्ती कमी असते, जसे एडस्‌चे किंवा कॅन्सरचे रुग्ण, अशा रुग्णांमध्ये गोवरच्या आजारामुळे पुढील कॉम्प्लीकेशन्स जास्त प्रमाणात दिसून येतात. गोवर हा शक्यतो लहान मुलांमध्ये दिसून येणारा आजार असला तरी क्वचित काही प्रमाणात मोठ्यांमध्ये देखील हा आजार होऊ शकतो. शक्यतो रुग्ण हे सर्वसाधारणपणे 5 वर्षांखालील वयोगटातील असतात. असे असले तरीही सर्वांनीच काळजी घेण हे क्रमप्राप्त आहे.

### गोवर हा साधारणतः 3 स्टेजेस् मध्ये दिसतो.

- पहिल्या स्टेजमध्ये रुग्णांमध्ये फ्ल्यू सदृश लक्षणं दिसून येतात. यात सर्दी, खोकला, घसा दुखणे, खूप ताप येणे अशी लक्षणं दिसतात. रुग्णांना अशक्तपणा जाणवतो. ही फेज 3-4 दिवस टिकते.
- दुसऱ्या स्टेजमध्ये रुग्णांमध्ये विशिष्ट असा रॅश (Rash/पुरळ) अंगावर येतो. हे पुरळ लालसर, कातडीपासून किंचित उभारलेले आणि जवळपास एकसमान असते. हे पुरळ सर्वप्रथम चेहऱ्यावर कानांच्या मागे, पुढे, गालांवर येते. नंतर ते खाली सर्व शरीरावर पसरत जाते. तोंडात, टाळूच्या मागील बाजूस, जीभेच्या मागे काही छोटे पांढरट चट्टे दिसतात. यांना कॉप्लिक स्पॉटस् असे म्हणतात. हा रॅश / पुरळ गौर त्वचेवर लगेचच दिसतो. मात्र सावळ्या त्वचेवर हा रॅश काहीवेळा स्पष्ट दिसून येत नाही. या दुसऱ्या स्टेजमधला रॅश हा साधारणतः 1 आठवडा राहतो. सुरवातीला लालसर असणारे हे पुरळ नंतर गडद होत जाते.
- तिसऱ्या स्टेजमध्ये काही रुग्णांमध्ये गुंतागुंत (complications) निर्माण व्हायला लागतात. इतर बहुतांश रुग्ण बरे होतात. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे ज्या रुग्णांमध्ये गुंतागुंत (complications) निर्माण व्हायला लागते त्याकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे असते. काही पेशंट्सना गोवरनंतर न्युमोनिया (Post- Measles Pneumonia) होऊ शकतो. काहींना जुलाब चालू होतात. गोवरचे इन्फेक्शन मेंदूत पोहोचल्यास काहींना मेंदूज्वर, एनसेफेलायटीस अशा काहीशा गंभीर कॉम्प्लीकेशन्स निर्माण होऊ शकतात. फार क्वचित काही रुग्णांमध्ये, गोवरमधून बरे झाल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर, सबअ‍ॅक्युट स्क्लेरोजिंग पॅनएनसेफॅलायटीस (SSPE) सारखी कॉम्प्लीकेशन उद्भवू शकते.

